दैनिक
# श्रमिक लोकराज्य
नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली येथे वितरीत होणारे वृत्तपत्र

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष ५ । अंक १८२ । शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ०४ । किंमत २ रुपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in

# राज्यात 30 लाख घरकुलांना मंजुरी!

## २.१० लाख रुपये अनुदान कसे मिळणार?

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुंबई :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यात गतवर्षात ३० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी चार लाख घरे पूर्ण झाली आहेत, तर दहा लाख घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. गत चौदा वर्षांत राज्यात एकूण २६ लाख घरकुले बांधली आहेत, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, प्रवीण दरेकर, भाई जगताप आदींनी या बाबत प्रश्न विचारला होता.

राज्यात गत काही महिन्यांत सुमारे ३० लाख घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी चार लाख घरांचे काम पूर्ण झाले आहे, तर दहा लाख घरकुलांना तिसरा हप्ता देण्यात आला असून, त्यांचे काम गतीने सुरू आहे. घरकुलांना एकत्रित २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. केंद्र सरकार १.२० लाख, २८ हजार मनरेगा योजनेतून, १२ हजार स्वच्छ भारत मिशन योजनेतून दिले जाते. राज्य सरकार ५० हजार अनुदान देते.



त्यात ३५ घरकुलासाठी आणि १५ हजार सौरऊर्जेसाठी दिले जातात, असे एकूण २.१० लाख रुपयांचे अनुदान मिळते.

**बेघरांना जमिनीसह घरकुल**

राज्यातील ज्या बेघरांकडे जमीन नाही, अशांना घरकुल देण्यात येते. गायरान, गावठाणातील जागा दिली जाते. जागा उपलब्ध नसेल तर जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. काही लाभार्थींनी एकत्र येऊन जमीन खरेदी केली तर बहुमजली इमारत बांधता येईल, तशी परवानगी दिली जाते. घरकुलांना पाच ब्रास वाळू मोफत दिली जाते. केंद्र सरकारने अनुदानात वाढ करावी, अशी मागणीही राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. सरकारने घरकुलांचे १६ हजार ४२६ अतिक्रमणे नियमित केली आहेत. १.१३ लाख लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे. पण, काही जणांनी गायरान, सरकारी जमिनीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. घरकुलांसाठीची जागा वगळता अन्य अतिक्रमणे नियमित करणे शक्य होणार नाही, असेही गोरे म्हणाले.

# नांदेडमध्ये 4,250 कोटींचा 'हेलीप्लांट' साकारणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडला दिलेला शब्द पाळला - खा. अशोकराव चव्हाण

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड :** निवडणुकीत नांदेडकरांनी कमळाची काळजी करावी, त्यानंतर पुढील पाच वर्षे नांदेडची चिंता मी करेन, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात दिला होता. नांदेडला तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांचा हेलीप्लांट प्रकल्प देऊन मुख्यमंत्र्यांनी आपला शब्द खरा करून दाखवल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांनी बुधवारी विधानसभेत बोलताना नांदेडमध्ये ४ हजार २५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार होत असल्याची घोषणा केली होती. या महत्वपूर्ण प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, राज्य सरकारने 'रिटाव्हिया प्रायव्हेट लिमिटेड' सोबत हा महत्वपूर्ण करार केला आहे.

या कराराअंतर्गत नांदेडमध्ये हेलिकॉप्टर निर्मिती, जुळवणी आणि सुट्या भागांच्या उत्पादनाचा प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच, हेलिकॉप्टरसाठी आवश्यक अभियांत्रिकी सेवा आणि देखभाल व दुरुस्ती सेवा देखील या ठिकाणी उपलब्ध असतील. या प्रकल्पामुळे १ हजार ८०० ते २ हजार थेट नोकऱ्या निर्माण होतीलच, शिवाय मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन जिल्ह्याच्या आर्थिक विकासात अधिक भर पडेल.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेत महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक असावे, या ध्येयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झपाट्याने काम करत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, नांदेडचा हेलीप्लांट प्रकल्प हे त्याचेच फलित असल्याचेही खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.**

# मुखेडसाठी रेल्वे अजूनही दिवास्वप्नच राहणार का? अधिवेशनातही प्रश्न उपस्थित नाही !

## लातूर रोड–जळकोट–मुखेड–बोधन रेल्वे मार्गासाठी निधीची प्रतीक्षा !

## निवडणुका आल्या की मुद्दा गाजणार अन् संपल्या की थंडावणार..!

**• १३५ किमी लांबीचा मार्ग • २४०९ कोटी अपेक्षित खर्च • ७३२ हेक्टर जमीन भूसंपादन करावी लागणार • २०१६ साली रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाली पण निधीअभावी प्रकल्प रखडलेला !**

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड :** नांदेड, लातूर आणि तेलंगणा सीमावर्ती भागाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा लातूर रोड–जळकोट–मुखेड–बोधन हा प्रस्तावित रेल्वेमार्ग गेल्या अनेक वर्षांपासून केवळ कागदावरच राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. २०१६ साली या रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाली असली तरी पुढील प्रक्रिया आणि निधीअभावी हा प्रकल्प अद्यापही रखडलेला आहे. त्यामुळे "मुखेडसाठी रेल्वे हा केवळ दिवास्वप्नच राहणार का?" असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

सुमारे १३५ किलोमीटर लांबीच्या या रेल्वेमार्गाचा प्राथमिक सर्वेक्षण अहवाल दक्षिण मध्य रेल्वेच्या वतीने तयार करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणानुसार हा रेल्वेमार्ग बोधन येथून मुखेड, जळकोट मार्गे पुढे चाकूरजवळील लातूर रोड लाईनला जोडला जाणार आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २४०९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून प्रति किलोमीटर जवळपास १७ कोटी ९१ लाख रुपये खर्च येणार असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.






या मार्गासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभाराव्या लागणार आहेत. संपूर्ण मार्गावर सुमारे ९३ पूल बांधण्याची आवश्यकता असून त्यापैकी १५ मोठे तर ७८ छोटे पूल असतील. तसेच या प्रकल्पासाठी सुमारे ७३२ हेक्टर जमीन भूसंपादन करावी लागणार आहे. या भूसंपादनासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असून त्यात केंद्र आणि राज्य सरकारचा समसमान वाटा असणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात प्रकल्पाच्या पुढील टप्प्याला सुरुवात होण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध न झाल्याने काम सुरू होऊ शकलेले नाही. विशेषतः भूसंपादनासाठी लागणाऱ्या निधीची जबाबदारी राज्य सरकारने उचलणे आवश्यक असताना त्याबाबत अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.

दरम्यान, सध्या सुरू असलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील काही रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य सरकार अर्धा आर्थिक वाटा उचलणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र कोणकोणत्या रेल्वे मार्गांसाठी हा वाटा दिला जाणार आहे याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे लातूर रोड–जळकोट–मुखेड–बोधन या रेल्वेमार्गाचा त्यामध्ये समावेश होईल का, याकडे या परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

हा रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास मराठवाडा आणि तेलंगणा यांच्यातील वाहतूक व्यवस्था मोठ्या प्रमाणात सुलभ होणार आहे. तसेच भविष्यात कोकण किनारपट्टी ते विशाखापट्टणम बंदर या दोन महत्त्वाच्या सागरी बंदरांना जोडणाऱ्या रेल्वे जाळ्यातही या मार्गाचा उपयोग होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

मुखेड, जळकोट, बोधन तसेच आसपासच्या भागातील नागरिक, व्यापारी व शेतकरी या रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. मात्र अद्यापही ठोस पाऊल उचलले गेले नसल्याने या भागातील विकासाला अडथळा निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांचे म्हणणे असेही आहे की निवडणुका जवळ आल्या की रेल्वे, रोजगार, स्थलांतर, एमआयडीसी अशा विकासाच्या मुद्द्यांची मोठ्या प्रमाणात चर्चा होते. राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधीही या मुद्द्यांच्या आधारे निवडणुका लढवतात. मात्र निवडणुका संपल्यानंतर हेच प्रश्न हळूहळू बाजूला पडतात आणि त्यावर ठोस पावले उचलली जात नाहीत.

आगामी काळात या परिसरातील लोकप्रतिनिधींनी लातूर रोड–जळकोट–मुखेड–बोधन रेल्वेमार्गाचा मुद्दा अग्रक्रमाने मांडून मुखेड तालुक्याच्या विकासासाठी रेल्वे प्रकल्पाला गती द्यावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. योग्य पाठपुरावा व निधी उपलब्ध झाल्यास हा प्रकल्प प्रत्यक्षात येऊन मुखेडसह संपूर्ण परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते, असे मतही नागरिक व्यक्त करत आहेत.

### लातूर–नांदेड व लातूर–बोधन रेल्वे प्रकल्पांना गती देण्याची खा. काळगे यांची मागणी

लातूर जिल्ह्यासह मराठवाडा परिसरातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी या उद्देशाने संसद भवन येथे केंद्रीय रेल्वे तसेच माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांची लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लातूर–नांदेड तसेच लातूर–बोधन या महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांना प्राधान्य देऊन त्यांची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## संपादकीय

# कंपनीने कोलवले!



ज्या मुद्द्यांवर मानवी विवेक, सारासार विचारबुद्धी आदींचा वापर होणे आवश्यक आहे ते आपल्या 'एआय' उत्पादनावर सोडण्याची मुभा सरकारला नाकारण्यावर 'अँथ्रोपिक' थांबली नाही...

अवघ्या पाच-सहा वर्षांच्या कंपनीने जगातील सर्वात बलाढ्य संरक्षण मंत्रालयावर खटला भरावा ही घटनाच मोठी अद्भुत. ती अमेरिकेसारख्या खऱ्या लोकशाहीवादी देशांतच घडू शकते. हा प्रकार 'संरक्षण', 'सामरिक हित' इत्यादी कारणे पुढे करत हवे ते रेटण्याची सोय यथेच्छ वापरणाऱ्या लोकशाहीची जननी इत्यादी असलेल्या आपल्यासारख्या देशांतील अनेकांस अविश्वसनीय वाटण्याचा धोका आहे. सबब त्याचा सविस्तर गोषवारा आणि त्यावर भाष्य गरजेचे.

'अँथ्रोपिक' हे अमेरिकेतील एक यशस्वी स्टार्टअप. कॅलिफोर्निया येथील ही कंपनी प्रामुख्याने कृत्रिम प्रज्ञा- म्हणजे आर्टिफिशल इंटलिजन्स (एआय)- क्षेत्रात काम करते. अलीकडे ती चर्चेत आली तिने विकसित केलेल्या 'क्लॉड' या एआय मदतनीसामुळे. जागतिक स्तरावर सर्वाधिक परिचित आहेत ते 'गूगल'चे 'जेमिनी' वा 'मायक्रोसॉफ्ट'चे 'चॅट जीपीटी' हे एआय साहाय्यक. हे दोन वा यातील किमान एक तरी पोराटोरांच्या मोबाइल वा संगणकात सर्रास आढळतो. त्यामुळे 'एआय' म्हटले की 'चॅट जीपीटी' वा 'जेमिनी' यांचाच उल्लेख होतो. पण 'अँथ्रोपिक'च्या 'क्लॉड'च्या तुलनेत 'चॅट जीपीटी' वा 'जेमिनी'हे अगदीच प्राथमिक बाळबोध आहेत. जेमतेम दहावी झालेल्यांच्या भाऊगर्दीत एखादा पीएचडीधारी असावा तसे या 'एआय'च्या भाऊगर्दीत 'क्लॉड'चे स्थान. तो बुद्धिमानांचा कृत्रिम बुद्धिमत्ता सल्लागार. त्याच्या क्षमतेच्या दिव्य दर्शनाने अलीकडेच जगातील बाजारपेठांचे डोळे दिपले आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुसंख्यांहाती या 'क्लॉड'मुळे नारळ द्यावा लागणार या वास्तवाच्या जाणिवेने या क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग आपटले. जगभरातील भांडवली बाजारात या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या या 'क्लॉड' जखमा अद्याप भरून आलेल्या नाहीत. हे श्रेय स्थापनेस जेमतेम सहा वर्षे झालेल्या कंपनीच्या नव्या उत्पादनाचे. हे यश हा जगभर चर्चेचा विषय झाला. इतके दिवस मानवी हातांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या निर्मितीची सूत्रे होती. क्लॉडमुळे कृत्रिम बुद्धिमान यंत्रेच पुढच्या पिढीची कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करू शकतील.सरकार कोणत्याही देशातील कोणत्याही पक्षाचे असो. प्रत्येक बाजारपेठीय यशाचा उपयोग स्वत:साठी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकारही असेच. त्या सरकारला 'क्लॉड'वर मालकी प्रस्थापित करण्याचा मोह झाला. त्यातून संरक्षण मंत्रालयाने, म्हणजे पेंटागॉन, या कंपनीशी करार केला आणि त्याचा वापर सुरू केला. येथवर सर्व ठीक. तथापि या क्लॉडची क्षमता लक्षात आल्यावर त्याचा अधिकाधिक वापर करण्याची इच्छा संरक्षण मंत्रालयास झाली. यातून दोन मुख्य उपयोगांवर या मंत्रालयाने लक्ष केंद्रित केले. एक म्हणजे शत्रुदेशाच्या कोणत्या प्रदेशावर कोणते क्षेपणास्त्र कधी डागावे याचा निर्णय 'क्लॉड'ने करावा आणि दुसरी अधिक गंभीर बाब म्हणजे गर्दीतूनही हवे ते चेहरे ओळखून त्याबाबत मंत्रालयास या 'एआय'ने सूचित करावे अशी अपेक्षा 'पेंटागॉन'ने 'अँथ्रोपिक'कडे व्यक्त केली. यातील दुसरे काम म्हणजे स्वत:च्या देशातील नागरिकांवर हेरगिरी करणे होते आणि पहिल्यानुसार महत्त्वाचे संरक्षणविषयक निर्णयही या 'एआय'वर सोडण्याचा संरक्षण मंत्रालयाचा मानस होता. हे अयोग्य आणि भयंकर. याचे कारण ज्या मुद्द्यांना हाताळताना मानवी विवेक, सारासार विचारबुद्धी आदींचा वापर होणे आवश्यक होते ते निर्णय हे मंत्रालय सरळ कृत्रिम प्रज्ञेवर सोडत होते. यातून नव्याच समस्या निर्माण होण्याचा धोका होता. एक म्हणजे या सल्ल्यानुसार समजा खरोखरच क्षेपणास्त्रे डागली गेली तर होणाऱ्या संहाराची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न. आणि दुसरे म्हणजे अमेरिकी कायद्यानुसार त्या देशाच्या हेरगिरी यंत्रणांस देशबांधवांवर हवी तशी हेरगिरी करता येत नाही. असे काही करणे हा केवळ नियमभंगच नव्हे; तर सभ्यसंस्कृती भंग ठरला असता. म्हणून 'अँथ्रोपिक'ने संरक्षण मंत्रालयाची मागणी धुडकावली. आणि 'क्लॉड'वरील नियंत्रणे हटवण्यास नकार देऊन त्याचा निर्रगल वापर रोखण्याचा एक प्रयत्न केला. झाले! त्यावर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले आणि संरक्षणमंत्री पीट हॅगसेथ यांनी या कंपनीवर जाहीर तोंडसुख घेतले. एक य:कश्चित कंपनी आपणास जाहीर नकार देते हे पाहून ट्रम्प यांचा तीळपापड झाला. आपणास हवी ती नियंत्रणे उठवणे कंपनीने नाकारल्याने देशाच्या सुरक्षा मुद्द्यांस तिने कमी लेखले असे संरक्षण मंत्रालयास वाटले. अध्यक्ष आणि संरक्षणमंत्र्यांच्या जाहीर तणतणाटानंतरही ही कंपनी बधली नाही. अखेर तीस 'काळ्या यादीत' टाकण्याचा इशारा सरकारने दिला. येथपर्यंत जे झाले ते एक वेळ समजून घेता येईल असे आहे. पण अमेरिकेच्या विद्यमान राजवटीस कोठे थांबावे हे कळण्याची मुदलात बोंब. त्यात त्यांना या लहानग्या कंपनीचा आत्मविश्वास सहन झाला नाही. त्यांनी या कंपनीस 'धोकादायक' (सप्लाय चेन रिस्क) यादीत टाकत असल्याचे जाहीर केले. त्याआधी या वादात 'अँथ्रोपिक'चा स्पर्धक असलेल्या 'ओपन एआय' कंपनीने उडी घेतली. आपल्या स्पर्धकांस संरक्षण मंत्रालयाची व्यवसाय संधी नाकारली जात असल्याचे पाहून ती साधण्यासाठी या कंपनीने मंत्रालयास जे हवे आहे ते देण्यास आम्ही तयार आहोत, अशी भूमिका घेतली. तीमुळे खरे तर अनेकांस धक्का बसला. 'ओपन एआय'ची कृती ही अनपेक्षित आणि संरक्षण मंत्रालयापुढे शरणागती पत्करणारी. तीस या कंपनीतूनच विरोध झाला आणि संरक्षण मंत्रालयाच्या दबावासमोर 'ओपन एआय'ने झुकण्याचा निषेध त्याच कंपनीतून झाला. या कंपनीच्या यंत्रमानव आणि संबंधित अभियांत्रिकी विभागातील ज्येष्ठ संशोधक केटलीन कालिनोवस्की हिने राजीनामा दिला. यामुळे 'अँथ्रोपिक'च्या भूमिकेलाच एक प्रकारे नैतिक पाठिंबा मिळाला. त्यामुळेही असेल पण या कंपनीने थेट 'पेंटागॉन'च्या कृतीला न्यायालयात आव्हान दिले. कॅलिफोर्निया न्यायालयात या कंपनीने आपल्याच देशाच्या संरक्षण मंत्रालयाविरोधात दोन खटले गुदरले असून आपल्या कंपनीस 'धोकादायक' संबोधणे हे अमेरिकी घटनेने दिलेल्या स्वातंत्र्याधिकारावर गदा असल्याचे म्हटले आहे. ही ताजी घटना. त्यामुळे या खटल्यांचे भवितव्य काय यावर लगेच भाष्य करता येणे अवघड. पण एखाद्या कंपनीस असे स्वत:च्या सरकारविरोधात न्यायालयात जावे असे वाटणे आणि सरकारने हे औद्धत्य सहन करणे ही बाब त्या देशातील लोकशाहीची निकोपता दर्शवते. याआधीही ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी 'ॲपल' कंपनीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. मोबाइल कंपन्यांकडे त्यांची सेवा वापरणाऱ्यांचा संपूर्ण विदा- डेटा- जमा होत असतो. कोणी कोठून कोणाशी फोनवर संपर्क साधला येथपासून ते त्यांच्यात झालेल्या संदेशांच्या देवाणघेवाणीपर्यंत वाटेल ती माहिती या कंपन्यांच्या साठ्यात जमा होते. ट्रम्प यांना ती हवी होती. त्यांनीही त्यासाठी 'राष्ट्रीय सुरक्षा' असे कारण त्या वेळी पुढे केले. अमेरिकी नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही माहिती मिळणे गरजेचे आहे, असा त्यांचा दावा आणि पवित्रा होता. ट्रम्प यांच्या या अरेरावीस 'ॲपल'चे टिम कुक यांनी एका पैचीही किंमत दिली नाही आणि त्यांची मागणी फेटाळली. "ही माहिती हा दूरसंचार सेवा उपभोक्ता आणि ती सेवा देणारा यांच्यातील करार आहे. त्याचे तपशील उघड करता येणार नाहीत", अशी ठाम भूमिका घेण्याची हिंमत त्या वेळी 'ॲपल'ने दाखवली. अखेर ट्रम्प यांना माघार घ्यावी लागली.

# छत्रपतीसारखं दिसणं नाही तर त्यांचे विचार असणं महत्वाचं-हभप राम महाराज पांगरीकर

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**हिमायतनगर :** आजची तरूण मुल डोक्यावर केस, चेहऱ्यावर दाढी, कंपाळी चंद्रकोर, लावुन छत्रपती शिवाजी महाराजां सारख काहिस दिसन पसंत करत आहेत, परंतु तरूणांनी राजे छत्रपती सारख दिसन नाही तर असन म्हत्वाच आहे, असा सल्ला तरूण मंडळींना हभप राम महाराज पांगरीकर यांनी दिला ते अखंड हरिणाम सप्ताहातील शेवटच्या दिवशी सरसम बु येथे काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलत होते.

विचारपिठावर गायनाचार्य ज्ञानेश्वर महाराज सिबदरेकर, सिंथवादक दत्ताजी नलावडे, साईनाथ शिंदे, हभप शिवाजीराव वडगावकर, हभप रामराव माने पोटेकर, संदिप पाटिल पवनेकर, मृदंगाचार्य वैभव सावळेश्वरकर, यांची उपस्थिती होते.

काल्याच्या किर्तनात पुढे बोलतांना हभप राम महाराज म्हणाले, काला जीवनाच महत्त्व सांगणारा आहे, भगवान म्हणतात सहा दिवस तुम्ही सप्ताह केला, सहा दिवस तुमची उपस्थिती होती, आज मी तुम्हाला प्रसाद द्यायला येतो, तो काल्याचा प्रसाद सर्वांनी घ्यायचा आहे. श्री कृष्णलिला प्रसंग सांगत घरात वागण्या पासुन राहण्या पर्यंत प्रसंगातुन साधकांना उपदेश केला , इष्ट कार्य करण्याच सांगत अनिष्ट कामे करू नये अस ते म्हणाले.

माणुस प्रसिध्द झाला तर त्यास काला मिळत नाही त्या करीता सिध्द व्हाव लागत. काल्याच महत्व गोपाळ, वारकऱ्यांना आहे.अस म्हणत भगवत भक्तीत स्वत:ला गुंतवुन सिध्द व्हाव. भक्ती दर्शनातुन करा देखाव्यातुन नको, भक्ती माझ्यामुळ होतेय अस मुळीच समजु नका,

आजची तरूण मुल डोक्यावर केस, चेहऱ्यावर दाढी, कंपाळी चंद्रकोर, लावुन छत्रपती शिवाजी महाराजां सारख काहिस दिसन पसंत करत आहेत, परंतु तरूणांनी राजे छत्रपती सारख दिसन नाही तर असन म्हत्वाच आहे, असा सल्ला तरूण मंडळींना दिला.

यावेळी माजी आमदार माधवराव पाटिल जवळगावकर, सरपंच संघटनेचे ता. अध्यक्ष परमेश्वर गोपतवाड, बंडु पाटिल इस्लापुरकर, ग्रंथपाल गोविंद गोडसेलवार, माजी सरपंच सुनिल वानखेडे, यदुराज मिराशे, सखाराम मंडलवाड, ॲड अतुल वानखेडे, रमेश शिंदे, नारायण कदम, झाकी कलाकार मोतीराम महाराज पार्डीकर, चोपदार विठ्ठलराव वांगे पोटेकर, तबलावादक सदाशिव महाराज पवनेकर, पॅडवादक ओंकार आंदेगावकर, सुनिल दमकोंडवार, साहेबराव गाडे, दिपक कल्याणकर यांची उपस्थिती होती.



**जवळगावकर ही बसले महाप्रसादाच्या पंगतीत**

**सरसम येथिल सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी माजी आमदार माधवराव पाटिल जवळगावकर यांनी दहिहंडी कार्यक्रमाला उपस्थिती लावली, दरम्यान ग्रामस्थां सोबत पंगतीत बसुन महाप्रसादाचा लाभ घेतला, भगवत भक्ती सोबतच पंगतीत बसुन भोजन केल्याने त्यांचा साधे पणा दिसुन आला.**

# राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत मानधन सन्मान योजनेच्या जिल्हास्तरीय समितीमध्ये शाहीर बळीराम जाधव यांची नियुक्ती

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नायगाव :** गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली जिल्हास्तरीय वयोवृद्ध कलावंत समिती अखेर पालकमंत्री अतुल सावे यांनी आदेशित केली असल्याने ग्रामीण भागातील विविध कलावंत व ग्रामीण साहित्यिक यांना शासन मानधन पासून वंचित राहण्याचा प्रश्न मिटला असून राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत मानधन सन्मान योजनेत जिल्ह्यातील दहा सदस्यांची नियुक्ती केली असून नायगाव मतदारसंघासाठी शाहीर बळीराम जाधव सुजलेगावकर यांची जिल्हास्तरीय समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ क्रमांक 1 चे शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 10 अ नुसार राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय समितीमध्ये इतर अशासकीय सदस्य यांच्या नावाची शिफारस नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी नामनिर्देशित केलेल्या दहा सदस्या पैकी



नायगाव मतदारसंघासाठी सदर जिल्हास्तरीय समितीवर तालुक्यातील मौजे सुजलेगाव येथील शाहीर बळीराम दिगंबरराव जाधव यांची नियुक्ती केली आहे.शाहीर बळीराम जाधव हे पूर्वीपासूनच कलावंताच्या सहवासात वाढलेले कलाकार आहेत. त्यांनी ग्रामीण भागातील कलावंतांना खऱ्या अर्थाने आजवर न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे शाहीर बळीराम जाधव हे सदर समितीवर नियुक्ती झाले असल्याने ग्रामीण कलावंत शासन मानधनापासून वंचित राहणार नाहीत ही अपेक्षा आहे शाहीर बळीराम जाधव यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# किनवट तालुक्यातील घरकुल लाभधारकाचे पैसे तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे बाळू पाटील पवार यांची मागणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**किनवट :** किनवट तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना ,शबरी माता, व रमाई माता या योजनेचे 27 हजार घरकुल मंजूर असून या अनेक लाभधारकांचे घरकुलाचे पैसे अध्याप त्यांच्या खात्यावर पडले नाहीत .त्यामुळे त्या लाभधारकांना मोठा आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. ते पैसे तात्काळ त्याच्या खात्यात जमा करावेत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) किनवट तालुका अध्यक्ष बाळू पाटील पवार यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे .

केंद्र व राज्य शासनाने एकही गरीब व्यक्ती निवाऱ्यापासून वंचित राहू नये या उदात हेतूने मोठ्या प्रमाणामध्ये घरकुलाला मंजुरी दिली. घरकुलाचे यादीमध्ये नाव आलेल्या लाभधारकांनी आपल्या घरकुलाचे काम सुरू केले. पण प्रधानमंत्री आवास योजना शबरी माता व रमाई माता घरकुल योजनेमध्ये 27 हजार घरकुलाला मंजुरी देण्यात आलेली आहे .यापैकी या तालुक्यातील जवळजवळ सहा ते सात हजार लाभार्थ्यांचे पहिल्याच हप्त्याचे पैसे सदरील घरकुलधारकाच्या खात्यावर पडले नाहीत. तसेच अनेक घरकुल लाभधारक पहिला हप्ता मिळायच्या नंतर कामाला सुरुवात केली. पण त्याचा दुसरा व तिसरा हप्ता अद्याप त्यांना न मिळाल्यामुळे त्यांना फार मोठा आर्थिक कुचुंबनेचा सामना करावा लागत आहे. ही लज्जास्पद बाब आहे. या कार्यालयातील ऑपरेटर असलेल्या लाभधारकांना अवमानकारक बोलतात जसे की ही योजना त्याच्या स्वतःच्या मालकीची असल्यासारखे वागतात.



तसेच आपल्या गावामध्ये जाऊन जिओ टॅगिंग करत नाहीत .तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीने आठ ते दहा महिन्याची घरकुल लाभ धारकाचा प्रस्ताव दिली असताना ,वारंवार या फायली घायाळ झाल्याची सांगण्यात येते. शक्य होईल तितकी लाभधारकांना अडचणीत आणून त्यांच्याकडून पैशाची मागणी केली जात आहे. असा आरोप बाळू पाटील पवार यांनी केला आहे. तसेच मयत लाभधारकांना वारसा साठी अनेक वेळा वारसांनी फाईल दिली असता, त्या फाईल गहाळ होतात त्यांचा वारसा जाणून बुजून केला जात नाही. जेणेकरून वारसा कडून हजार रुपये उकळता येतील याची काळजी आपले ऑपरेशन घेत आहेत. ही गंभीर स्वरूपाची बाब आहे .तसेच पहिला दुसरा व तिसरा हप्ता एफ टी ओ न करता तुम्ही बँकेत जाऊन तपासा असे लाभधारकांना खोटी माहिती देऊन बेजार केले जाते. जेव्हा लाभधारक बँकेत जाऊन येतो निधी जमा झाला नाही असा अभियंता व ऑपरेटरला सांगतो तेव्हा तुमचे आधार सेटिंग डीबीटी तुम्ही केली नाही म्हणून पैसे पडत नाही असा खोट्या भूल थापा दिल्या जातात ही मात्र अशोकनीय बाब आहे .सदरील घरकुल येथील मानधन तत्वावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाभ धारकाच्या समस्या सोडविण्यासाठी नेमणूक केली आहे .परंतु तसे कुठेही होताना दिसत नाही .त्यामुळे आपणास नम्र विनंती की पहिला हप्ता लाभदाराच्या नावाने का जमा होत नाही. हे शोधून त्याचे नाव नावे पहिला हप्ता जमा करण्यात यावा. व दुसरा व तिसरा हप्ता हे सुद्धा लाभधारकांच्या खात्यावर आठ दिवसात जमा करण्यात यावा. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल याची याबाबतची निवेदन बाळू पाटील पवार यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांना दिली आहे. याबाबतची माहिती प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण यंत्रणा नांदेड यांना सुद्धा कळविण्यात आली आहे.

# नांदेड-अर्धापूर महामार्गावर 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' उभारा!

## खा. अशोकराव चव्हाण यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडे मागणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** राष्ट्रीय महामार्गावर नांदेड शहर ते अर्धापूर दरम्यान अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता या भागात 'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' आणि सीसीटीव्ही पाळत ठेवणारी यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली आहे.

सदर महामार्गावरील सतत होणारे अपघात व जीवित हानी लक्षात घेता ही अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली असून, याबाबत त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी विस्तृत चर्चा केली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येणारा अर्धापूर जवळील पार्डी मक्ता टोल प्लाझा ते नांदेड शहरातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ प्रवेशद्वारपर्यंत सुमारे ३३ किलोमीटरचा रस्ता सध्या अत्यंत अपघातप्रवण झाला आहे.

या मार्गावरील वाहनांची वाढती संख्या आणि अलीकडच्या काळात झालेले अनेक गंभीर अपघात पाहता वाहतूक नियंत्रणासाठी व आपात्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज असल्याचे खा. चव्हाण यांनी यावेळी सांगितले.



**'इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' आणि सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यानंतर वाहतुकीवर २४ तास सतत नियंत्रण व देखरेख, अतिवेगाने धावणारी वाहने व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई, तसेच अपघात व वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी तातडीने मदत पोहोचवणे शक्य होईल, असे ते पुढे म्हणाले. खा. अशोकराव चव्हाण यांनी मांडलेल्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत लवकरच योग्य निर्णय घेण्यास अनुकूलता दर्शवली आहे.**

# पोलिस प्रशासनाच्या समोरच अवैध धंदे ऐरणीवर !

## अवैध गुटखा,मटका,दारू अन अवैध वाळूचाही चटका!




श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुदखेड :** मुदखेड तालुक्यातील बारड पोलिस ठाणे हद्दीत सध्या अवैध धंद्यांनी अक्षरशः डोकेवर काढले असून पोलिस प्रशासनाच्या नजरेसमोरच हे प्रकार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. गुटखा विक्री,मटका अड्डे,अवैध दारू विक्री तसेच अवैध वाळू वाहतूक अशा विविध बेकायदेशीर धंद्यांना जणू काही खुलेआम मोकळीक मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते,काही ठिकाणी गुप्तपणे नव्हे तर उघडपणे गुटख्याची विक्री सुरू आहे. त्याचप्रमाणे बसस्थानक परिसरात मटक्याचे अड्डेही दिवसाढवळ्या चालत असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे परिसरातील युवकांवर व कुटुंबांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.याशिवाय अवैध दारू विक्री आणि अवैध वाळू वाहतूक हा देखील गंभीर विषय बनला आहे. रात्रीच्या वेळी टिप्पर, हायवा व डंपरच्या माध्यमातून वाळूची वाहतूक होत आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याचे बोलले जात आहे.

या सर्व प्रकारांमुळे बारड पोलिस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून संबंधित प्रशासनाने तात्काळ कारवाई करून अवैध धंद्यांवर आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आता पोलिस प्रशासन या प्रकरणाची कितपत गंभीर दखल घेते आणि अवैध धंद्यांवर कितपत कारवाई करते,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चार वर्षांपासून अर्धवटच सिरपल्ली-पळसपूर-डोलारी मार्ग; निकृष्ट कामामुळे नागरिक त्रस्त

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**हिमायतनगर :** शहरातून सिरपल्ली, पळसपूर, डोलारी मार्गे ढाणकी गावाकडे जाणाऱ्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याचे काम मागील चार वर्षांपासून अर्धवटच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ठेकेदार, संबंधित अभियंते तसेच लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे हा रस्ता अद्याप पूर्ण न झाल्याचा आरोप नागरिकांतुन केला जातं आहे.

या रस्त्याच्या कामाला सुमारे चार वर्षांपूर्वी सुरुवात झाली होती. मात्र रस्त्याचे काम अत्यंत संत गतीने आणि निकृष्ट दर्जात सुरू असून, मुख्य ठेकेदार औरंगाबाद येथील असून, त्यांनी हे काम स्थानिक एका सब-ठेकेदाराला दिले आहे. त्या ठेकेदार मार्फत रस्ता व पुलांचे काम करण्यात येत असल्याचे सांगितले जात असून, अत्यंत निकृष्ट व थातूर माथुर पद्धतीने रस्ता व पुलाचे काम झाल्याने आज घडीला अनेक ठिकाणी रस्ता उखडून गेला आहे याबाबत वारंवार तक्रारी करूनही कामाच्या गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली नाही. तसेच काही ठिकाणी करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाला पुढे गेले असून महिन्याभरातच रस्त्याची वाट लागली आहे. त्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीची नासाडी होत असल्याची टीका तक्रारकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी ढोणे व मुन्नाभाई शिंदे यांनी केली आहे.

सध्या तयार झालेल्या डांबरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, अनेक पुलांचे काम अर्धवट अवस्थेत आहे. शहरानजिक व इतर भागात सुरू असलेले पूल अद्याप पूर्ण न झाल्याने शेतकरी व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अत्यंत निकृष्ट पद्धतीने काम सुरू असतानाही संबंधित अभियंता व लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष का करत आहेत? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.



**शहरानजिक असलेल्या नडव्याच्या पुलाजवळ जाणाऱ्या रस्त्याचे काम अर्धवट असल्याने गिट्टी ऊघडी पडली असून, रस्त्यावरून ये -जा करणारे वाहन किरकोळ अपघात होतं आहेत. यापूर्वी सिरपल्ली ते हिमायतनगर प्रवास करतांना अनेककांची वाहने स्लिप होऊन अपघात घडले आहेत. तर काहींना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या असताना देखील ठेकेदाराकडून पुलांसह रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने करण्यास चालढकल होतं आहे. त्यामुळे रस्त्याचे व पुलाचे काम मनमानी पद्धतीने होतं असल्याने भविष्यात मोठ्या अपघाताला निमंत्रण मिळू शकते, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.**

# आकांक्षा गायकवाड मृत्यू प्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करा

## पीडित कुटुंबाला 1 कोटींची मदत देण्याची मागणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** आकांक्षा मुंजाजी गायकवाड यांच्या मृत्यू प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून पीडित कुटुंबाला एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (एबीएस फोर्स) महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आकांक्षा मुंजाजी गायकवाड (वय २५) ही उच्च शिक्षण घेणारी विद्यार्थिनी होती. ती आपल्या कुटुंबासह राहत होती. मात्र काही दिवसांपूर्वी तिचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या घटनेमुळे गायकवाड कुटुंबावर मोठे दु:ख कोसळले असून त्यांना मानसिक व आर्थिक धक्का बसला आहे. त्यामुळे शासनाने पीडित कुटुंबाला तात्काळ एक कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून न्याय मिळवून द्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सदर निवेदनावर जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, एन .जी .पोतरे , जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोयणर, रमेश सुर्यवंशी , जिल्हाध्यक्षा सुकमलाताई वाघमारे , भुजंग गायकवाड़ , मल्हारी गायकवाड, जयसिंग कांबळे,अक्षय बोयाळ , ज्ञानेश्वर गायकवाड़ , मुंजाजी मुळेकर , खानजोडे ताई, सुभाष वाघमारे , उतम जाधव , बालाजी दुदगोंडे कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या असून प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# माजी नगराध्यक्ष द्वारकादास जाजू यांचे निधन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** मुखेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष द्वारकादास जाजू यांचे अल्पशा आजाराने आज दिनांक १२ मार्च २०२६ रोजी निधन झाले.

त्यांच्या निधनामुळे मुखेड शहरातील सामाजिक, राजकीय व व्यापारी क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

द्वारकादास जाजू यांनी नगराध्यक्ष पदावर असताना शहराच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. नगरपरिषद प्रशासनात पारदर्शकता राखत नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांच्या कार्यकाळात शहरातील विविध विकासकामांना गती मिळाली होती.

त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन मुले नातू पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी मुखेड शहरातील बुडकी स्मशानभूमी येथे दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

ते अत्यंत मनमिळावू, शांत व सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. समाजातील सर्व घटकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपले होते.



त्यांचा मुलगा अनिल जाजू हे सुद्धा मुखेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राहिलेले आहेत तर सुनबाई सौ.अंजली अनिल जाजू ह्या विद्यमान नगरसेविका आहेत. तर आडत व्यापारी दिलीप जाजू व कंत्राटदार अशोक शेठ जाजू यांचेही ते वडील होते.

# स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे व्यासपीठ-पांडुरंग पावडे

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुदखेड :** मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयात दि.१० ते १२ मार्च या कालावधीत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले असून यात समारोप व बक्षीस वितरण समारंभासाठी पांडुरंग पावडे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण तसेच कै.शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर या कार्यक्रमास सुरुवात झाली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे पांडुरंग पावडे म्हणाले की,वार्षिक स्नेहसंमेलन हे केवळ आनंद आणि उत्साह साजरा करण्याचे साधन नसून विद्यार्थ्यांमध्ये एकता, एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी वाढविण्याचे प्रभावी माध्यम आहे. अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचा आविष्कार घडून येतो.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.टी. शिंदे होते.अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी सांगितले की, वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेम,आपुलकी, जिव्हाळा आणि स्नेहभाव वाढतो. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते.

या स्नेहसंमेलनात वादविवाद, वक्तृत्व,पोस्टर प्रेझेंटेशन, पीपीटी सादरीकरण,संगीत खुर्ची, काव्यवाचन,गीतगायन, शॉर्ट रिल्स व व्हिडिओ निर्मिती अशा विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .तसेच बुद्धिबळ,बॅडमिंटन,भालाफेक, थाळीफेक,गोळाफेक अशा क्रीडा स्पर्धाही घेण्यात आल्या होत्या . विविध स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.




**कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.दत्ताजी मेहेत्रे यांनी तर सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. राहुल धावारे यांनी तसेच आभार प्रा.डॉ.सतीश उमाटे यांनी मानले.**

**कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ.अर्जुनसिंग ठाकूर व एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. प्रकाश कोथळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# बिलोली शहरात ‘भयंकर आजारी’ कुत्र्यांचा वावर


## नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण, नगरपालिकेचे दुर्लक्ष!

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**बिलोली :** बिलोली शहरात सध्या एका भयंकर चर्मरोगाची लागण झालेल्या कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, यामुळे शहरात भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अंगावर केस नसलेले, जखमा झालेले आणि अतिशय विद्रूप अवस्थेत असलेले हे कुत्रे मुख्य रस्ते, बाजारपेठ आणि शाळेच्या परिसरात फिरताना दिसत आहेत. या गंभीर समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

शाळकरी मुले आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न शहरातील अनेक भागांत हे कुत्रे अचानक समोर येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड भीती पसरली आहे. शाळेत जाणाऱ्या लहान मुली आणि बालकांना या कुत्र्यांपासून धोका निर्माण झाला आहे. केवळ भीतीच नाही, तर या कुत्र्यांच्या संपर्कात आल्यास हा संसर्गजन्य रोग इतर पाळीव कुत्र्यांना आणि लहान मुलांनाही होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.





शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना नगरपालिका प्रशासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. या आजारी कुत्र्यांचा बंदोबस्त करणे किंवा त्यांच्यावर उपचार करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवणे गरजेचे आहे. मात्र, प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळे जनतेच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नगरपालिकेने तातडीने अशा आजारी कुत्र्यांचे सर्वेक्षण करून त्यांना पकडण्याची मोहीम राबवावी. संसर्ग पसरू नये यासाठी पशुवैद्यकीय विभागाची मदत घेऊन योग्य उपाययोजना कराव्यात. वाढती संख्या रोखण्यासाठी निर्बीजीकरणाची प्रक्रिया वेगाने राबवावी.या आजारावर न.प.प्लाशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत, तर हा आजार माणसांमध्ये पसरण्यास वेळ लागणार नाही. प्रशासनाने एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता त्वरित कारवाई करावी अशी मागणी जागरूक नागरिकांच्या वतीने होत आहे.

# धर्माबाद ग्रामीण रूग्णालयातील डायलिसिस सेंटर मध्ये जागतिक किडनी दिवस उत्साहात साजरा

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**धर्माबाद :** ग्रामीण रुग्णालय येथे काही महिन्यांपासून डायलिसिस सेंटर सुरू झाले आहे सरकारी रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू झाल्यामुळे अनेक गरिब रुग्णांना सवलतीच झाले आहे. दरवर्षी मार्च महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी रुग्णालयात ‘जागतिक किडनी दिन’ साजरा केला जातो. दि.१२ मार्च रोजी जागतिक किडनी दिवस निमित्त धर्माबाद येथील रुग्णालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. मोनिका पावडे यांनी किडनीचे आरोग्य जपण्यासाठी योग्य आहार, नियमित तपासणी आणि पाणी पिण्याचे महत्त्व याबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व केक कट करून करण्यात आली. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी सांगितले की, आज काल बदललेल्या जीवनशैलीमुळे किडनी संबंधित आजार वाढताना दिसत आहेत. त्यामुळे वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे, रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.या प्रसंगी रुग्णालयात आलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आली तसेच किडनीचे आरोग्य कसे जपावे याबाबत माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाल पंडित साहेब , डॉ. मोनिका पावडे,वैद्यकीय अधिकारी अनुजा तुमोड इंन्चार्ज सिस्टर शुभांगी सुर्यवंशी, सिनीयर तंत्रज्ञ संघशिल कांबळे, ज्युनिअर तंत्रज्ञ सम्यक कांबळे अधिपरीचारीका निकिता नागलवाडे ,सफाई कर्मचारी उत्तम वाघमारे, डॉ.ज्ञानेश्वर शिरगिरे,अधीपरिचारीका, छाया कुलकर्णी,मनिषा महामुनी, सह रुग्णालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी किडनीच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा आणि इतरांनाही याबाबत माहिती देण्याचा संकल्प केला. किडणी दिनाच्या शुभेच्छा निमित्ताने काढण्यात आलेल्या रांगोळीने सर्वांचं लक्ष केंद्रित केले.




हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# संघर्ष, जिद्द आणि माणुसकीचा प्रवास

## जांब नगरीचे भूमिपुत्र

# श्याम शिंदे

13 मार्च

## वाढदिवस अभिष्टचिंतन

**जांब नगरीत अनेक कार्यकर्ते झाले, अनेकांनी राजकारण केले; पण समाजासाठी स्वतःचे सुख-दुःख बाजूला ठेवून काम करणारी काही मोजकी माणसं गावाच्या इतिहासात वेगळी ओळख निर्माण करून जातात. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे जांब नगरीचे भूमिपुत्र श्याम शिंदे.**

साध्या कुटुंबातून आलेल्या श्याम शिंदे यांनी मोठ्या पदाच्या किंवा सत्तेच्या जोरावर नव्हे, तर जिद्द, संघर्ष आणि समाजासाठी असलेल्या निस्वार्थ भावनेच्या बळावर आपली ओळख निर्माण केली. गावातील सर्वसामान्य माणसांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, अडचणीत धावून जाणारा आणि गावाच्या विकासासाठी सतत झटणारा कार्यकर्ता म्हणून त्यांना आज गावात मान मिळतो.

श्याम शिंदे यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात एका संघर्षातून झाली. जांब येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भगवा झेंडा बसवण्याचा त्यांनी घेतलेला निर्धार त्या काळात मोठा वादाचा विषय ठरला. झेंडा बसवल्यानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला. परंतु संकटांची भीती न बाळगता त्यांनी तब्बल अकरा वर्षे न्यायासाठी संघर्ष केला. अखेर त्यांच्या जिद्दीसमोर अडथळे झुकले आणि आज तो परिसर अभिमानाने छत्रपती शिवाजी महाराज चौक म्हणून ओळखला जातो. हा लढा म्हणजे त्यांच्या शिवभक्तीचा आणि धैर्याचा जिवंत इतिहासच ठरला.

याच ठिकाणाहून गावात छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सवाची परंपरा सुरू झाली. या उत्सवाचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान श्याम शिंदे यांना मिळाला. अध्यक्ष म्हणून त्यांनी जयंती उत्सवाला केवळ मिरवणुका आणि कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजसेवेची जोड दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली, तसेच अनाथ मुलांना वह्या, पुस्तके आणि दप्तर वाटप करून समाजात माणुसकीचा संदेश दिला.

श्याम शिंदे यांच्या कार्यात माणुसकीची भावना विशेष ठळकपणे दिसून येते. एकदा बाहेर राज्यातील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या अंत्यसंस्कारासाठी गावात जागा मिळत नव्हती. त्या वेळी कुणीही पुढे येत नसताना श्याम शिंदे यांनी स्वतःच्या शेतामध्ये त्या व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी जागा उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कृतीने माणुसकीचा खरा अर्थ समाजासमोर उभा राहिला.

गावाच्या विकासासाठी काहीतरी करण्याच्या उद्देशाने त्यांनी जिल्हा परिषद निवडणूकही लढवली. गावातील लोकांनी त्यांना मोठा पाठिंबा दिला; मात्र आसपासच्या गावांतून अपेक्षित मतदान न मिळाल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. तरीही पराभवाने त्यांची जिद्द कमी झाली नाही, उलट समाजसेवेचा त्यांचा उत्साह अधिक वाढला.

नविन आबादी परिसरात जिल्हा परिषद शाळा मंजूर झाली होती; पण त्या शाळेसाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी श्याम शिंदे यांनी मोठेपण दाखवत आपली स्वतःची जागा एक रुपयाही न घेता शाळेसाठी दान दिली. त्यांच्या या निर्णयामुळे त्या भागातील अनेक मुलांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला.

**शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून काम करत असताना त्यांनी शाळेत विविध शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रम राबवले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शिक्षण, समाजकार्य आणि गावाचा विकास यासाठी त्यांची धडपड कायम दिसून येते. सध्या ते ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असून गावातील प्रत्येक प्रश्नात ते सक्रियपणे पुढाकार घेताना दिसतात. गरीब, शेतकरी, विद्यार्थी किंवा सर्वसामान्य नागरिक , कोणतीही अडचण असो, मदतीसाठी पुढे धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.**

**संघर्षातून घडलेला, माणुसकी जपणारा आणि समाजासाठी आयुष्य समर्पित करणारा हा जांब नगरीचा भूमिपुत्र आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. श्याम शिंदे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत असून, त्यांनी पुढील काळातही समाजसेवेचा हा दीप प्रज्वलित ठेवावा, हीच सर्वांची मनापासून अपेक्षा आहे.**



-
लेखन
**सोमनाथ राऊत**
दैनिक श्रमिक लोकराज्य प्रतिनिधी जांब